# मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग
जा.क्र. मनपा/घ.व्य./४७७/2025-26
दि. २२/०७/2025

प्रति,
1. **सिस्टीम मॅनेजर**
   नागरी सुविधा केंद्र

2. **जनसंपर्क अधिकरी**
   मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत कंत्राटी शहर समन्वयक पदाकरीता जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात येत आहे.

उपरोक्त कामाची जाहिरात महानगरपालिका संकेतस्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

२४/०७/२५

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Z:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\TENDER FILE\JAN SAMPARK & system docx

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय : पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दुरध्वनी : 022-28192828/28193028 ई- मेल : swmhealth@mbmc.gov.in

घनकचरा व्यवस्थापन विभाग


जा.क्र.मनपा/घ.व्य./ ४२०९ /2025-26 दि. २२ /०७ /2025

**मिरा भाईंदर महानगरपालिका कंत्राटी शहर समन्वयक (City Co-ordinator) पदाकरीता थेट मुलाखत (Walk In Selection)**

## जाहीर सुचना

मिरा भाईंदर महानगरपालिका कंत्राटी शहर समन्वयक (City Co-ordinator) पदाकरीता तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्यांच्या नियुक्तीकरीता 02 जागा थेट मुलाखतीव्दारे (Walk In Selection) भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासह मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याची विनंती करत आहेत. खाली नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांनी. विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांची झेरॉक्स प्रत टपालव्दारे अथवा स्वत: मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय. पहिला मजला. घनकचरा व्यवस्थापन विभाग. भाईंदर (प) येथे दि.31/07/2025 पर्यंत मुदतीत पाठविण्यात यावेत. सदर पदाकरीता आवश्यक प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतींसह दि.06/08/2025 या दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 12.00 या वेळेत मा. अति. आयुक्त यांचे कार्यालय मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पहिला मजला, भाईंदर (प) ठाणे 401101 येथे स्वखर्चाने मुलाखतीकरीता उपस्थित रहावे. याबाबतची सविस्तर माहिती मिरा भाईंदर महानगरपालिका www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- **उपलब्ध पद संख्या – 2 (ठोक मानधन (मासिक) रु. 45,000/- (सर्व भत्यांसह))**

सदर पदाकरीता अर्ज तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्द व अर्ज स्विकृती | दि.23/07/2025 ते दि.31/07/2025 |
| 2 | अर्ज छाननी | दि.04/08/2025 |
| 3 | पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द | दि.04/08/2025 |
| 4 | मुलाखत | दि.06/08/2025 रोजी सकाळी दुपारी 12.00 वाजता |
| 5 | निवड यादी प्रसिध्द करणे | दि.06/08/2025 रोजी सकाळी दुपारी 4.00 वाजता |

1. **शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | कंत्राटी शहर समन्वयक<br>City Co-ordinator | 1) मान्यता प्राप्त विद्यापिठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ. बी. ई. / बी. टेक (कोणतीही शाखा)<br>आ. बी. आर्क<br>इ. बी. प्लॅनिंग<br>ई. बी. एस. सी.(B.Sc.) (कोणतीही शाखा) | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. |



Scanned with OKEN Scanner

2) **वयोमर्यादा :-**

2.1 उमेदवारांकरीता किमान वयोमर्यादा 18 वर्षे पूर्ण व कमाल 35 वर्षे आहे. (शहर समन्वयक म्हणून धारण करणाऱ्या उमेदारास अनुभवा इतकी वयोमर्यादा शिथील करता येईल)

3) **पद भरतीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.**

3.1 जाहिरातीत नमुद आवश्यक पदाकरीता थेट मुलाखत (Walk in Selection) पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल.

3.2 प्रत्येक उमेदवारास 15 पैकी गुण देण्यात येतील.

| अ.क्र. | पदाचे नाव | गुणांकनाची पध्दत |
|---|---|---|
| 1 | **शहर समन्वयक**<br>**City Co-ordinator** | **अ.** अनुभव (एकुण 7 गुण)<br>1. शहर समन्वयक म्हणुन 3 टर्म चा अनुभव 7 गुण<br>2. शहर समन्वयक म्हणुन 2 टर्म चा अनुभव 6 गुण<br>3. शहर समन्वयक म्हणुन 1 टर्म चा अनुभव 5 गुण<br>4. शहर समन्वयक च्या व्यतिरिक्त (स्वच्छ सर्वेक्षण / घनकचरा व्यवस्थापन / पर्यावरण विभागात काम करण्याचा अनुभव) – 3 गुण<br>**ब. मुलाखत – एकुण – 3 गुण**<br>**क. स्वच्छ भारत अभियानाविषयीचे ज्ञान (एकुण – 5 गुण)** |

3.3 पात्र उमेदवार व प्रतिक्षा यादीमधील उमेदवार यांची यादी फलकावर तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर शक्यतो त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात येईल.

3.4 निवड यादी गुणानुक्रमे प्रसिध्द करण्यात येत असल्याने निवड झालेल्या उमेदवारा व्यतिरिक्त इतर सर्व उमेदवार प्रतिक्षा यादीत राहतील.

3.5 प्रतिक्षा यादीची विधी ग्राह्यता 1 वर्षाची असेल.

4) **सुचना :-**

4.1 रेल्वेने येणाऱ्या उमेदवारांना भाईंदर (प.) रेल्वेस्थानक येथे उतरुन रिक्षा किंवा बसने मुलाखत स्थळी पोहचता येईल.

4.2 बसने येणाऱ्या उमेदवारांना भाईंदर (प.) येथे एसटी अथवा मनपाने बस मुलाखत स्थळी पोहचता येईल.

५) **अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सुचना :-**

उमेदवार निवडण्याची पध्दत :-

५.१ जाहिरातीतील विहित नमुन्यातच टाईप केलेले अर्ज, स्वतःचा अलिकडील पासपोर्ट साईज फोटो चिकटवुन सादर करावा.

५.२ मुलाखतीस येताना अर्जदाराने मूळ प्रमाणपत्रे आणावीत. तसेच अर्जासोबत खालील क्रमाने मूळ प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात.

अ) शाळा सोडल्याचा दाखला.

ब) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, तांत्रिक अर्हतेची प्रमाणपत्रे

क) अनुभवाचे प्रमाणपत्र.

ड) डोमिसाईल प्रमाणपत्र. (महाराष्ट्रात वास्तव्य).

५.३ सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५.४ तोंडी मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

५.५ उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.



Scanned with OKEN Scanner

५.६ कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या शहर समन्वयकांना कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत, अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत, अशा प्रकारे नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी शहर समन्वयकाची नियुक्ती ही ११ महिन्यांपर्यंत राहील. तथापि, प्रशासकीय कारणास्तव व समाधानकारक काम नसणाऱ्या शहर संमन्वयकांची सेवा कंत्राटी कालावधी पुर्ण होण्यापुर्वीच समाप्त करण्याचे अधिकार संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

५.७ शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जून २०११ नुसार (I) परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(II) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

५.८ एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

५.९ सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८/०३/२००५ नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणाऱ्या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहित असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.१० अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) स्वत: साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५.११ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल./शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

५.१२ एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ मधील निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

५.१३ अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

५.१४ निवड झालेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रतेची मूळ प्रमाणपत्रे संबंधित मंडळ/ विद्यापीठ/संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधिताना नोकरीतून कमी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

५.१५ निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

५.१६ निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही, असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

५.१७ जाहिरातीमधील नमूद पदसंख्या कमी अथवा अधिक करण्याचे तसेच कोणतीही भरती पदे रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

५.१८ प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

५.१९ सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची राहिल. उमेदवारांना कोणत्याही स्वरुपाचा शासकीय नोकरीचा दावा करता येणार नाही.

**६. विशेष सूचना :-**

६.१ मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातून फसवणूक झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

६.२ सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६.३ सदर भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रत महानगरपालिकेकडे जमा राहतील.

**७. कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City Co-ordinator) नियुक्त यांच्या कर्तव्य व जबाबदारी.**

७.१ शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा (CSWAP), शहर स्वच्छता कृती आराखडा (CSAP) तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी सहाय्य करणे.

७.२ प्रकल्पाची अंमलबजावणी विहीत मुदतीत पूर्ण करून तो शाश्वत व कार्यान्वयन होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे.

७.३ प्रकल्प आर्थिकदृष्ट्या शाश्वत राहण्यासाठी वापरकर्ता शुल्क वसुल करणेसाठी पाठपुरावा करणे.

७.४ जनजागृती व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी नियोजन करणे.

७.५ स्वच्छतम पोर्टलवर दरमहा (MIS) अहवाल अद्ययावत करणे.

७.६ माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती या घटकांतर्गत "कचरामुक्त" शहराचे ध्येय साध्य करण्याकरिता विविध उपाययोजना / कार्यक्रम आयोजित करणे.

७.७ दैनंदिन कचरा वर्गीकरण, संकलन तसेच वाहतूक व प्रक्रिया सुरळीत चालण्यासाठी आवश्यक ते नियोजन करणे.

७.८ स्वच्छ भारत अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत "कचरामुक्त" शहराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ............................................................. )

प्रति,
मा.आयुक्त सो.
मिरा भाईदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

| | | | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|---|---|
| (१) | संपुर्ण नांव | : | | |
| १. | आडनांव | : | ............................................ | ............................................ |
| २. | स्वत:चे नांव | : | ............................................ | ............................................ |
| ३. | वडिलांचे/ पतीचे नांव | : | ............................................ | ............................................ |

(२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोडसहित) : ..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................
..........................................................................................

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ..........................................................................................

(३) जन्मतारीख :

| तारीख | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(४) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? : होय/नाही

(६) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये ✓ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | खुला | इडब्ल्यु एस | ईएसबीसी | वि.मा.प्र.(अ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

(७) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वतःचा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या ✓ चौकटीमध्ये अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | खुला | इड ब्ल्यु एस | ईएसबी सी | वि.मा.प्र. (अ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

(८) शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | | | | |
| ६. | | | | |

(९) अनुभवः

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१०) अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(११) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(१२) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) .......................... २) ...................................... ३) ......................................

४) .......................... ५) ...................................... ६) ......................................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

अर्जदाराची सही/-

दिनांक :-

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील
प्रतिज्ञापनाचा
नमुना-अ

प्रतिज्ञापत्र
नमुना-अ
(नियम ४ पाहा)

मी श्री./श्रीमती............................................. श्री............................................ यांचा/ यांची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय............. वर्ष, राहणार.................................................................. याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी.......................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला............. इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

अर्जदाराची सही/-

दिनांक :-



Scanned with OKEN Scanner